# महाराष्ट्र शासन

## अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई

## पुरवठा निरीक्षक संवर्ग सरळसेवा भरती 2018.

महाराष्ट्र शासन, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग परिपत्रक क्रमांक आस्थाप्र-1016/प्र. क्र. 502/ना. पु. 15 दिनांक 28/02/2017 अन्वये दिलेल्या निर्देशानुसार विभागीय आयुक्त कोकण विभाग, नाशिक विभाग, पुणे विभाग व औरंगाबाद विभाग यांचे आस्थापनेवरील पुरवठा निरीक्षक संवर्गातील रिक्त पदे विहित शैक्षणिक अर्हता धारण करत असलेल्या पात्र उमेदवारांमधून भरण्यासाठी महाराष्ट्र शासन, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांनी दिनांक 27/04/2018 च्या आदेशान्वये उप आयुक्त (पुरवठा), कोकण विभाग यांना प्राधिकृत केलेल्या प्राधिकारानुसार प्रकल्प व्यवस्थापक, महापरीक्षा पोर्टल यांचे मार्फत स्पर्धात्मक परिक्षेसाठी केवळ ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरावयाची सुविधा www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच सदर जाहिरात महाराष्ट्र शासनाच्या www.mahafood.com आणि www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

## परीक्षेचे वेळापत्रक

| अ.क्र. | प्रक्रीया | दिनांक |
|---|---|---|
| 1. | ऑनलाईन अर्ज व शुल्क भरण्याचा कालावधी | 28 मे 2018 ते 17 जून 2018 |
| 2. | प्रवेशपत्र (Hall Ticket)ऑनलाईन काढून घेणे | 28 जून 2018 पासून पुढे |
| 3 | ऑनलाईन परिक्षा दिनांक | 17 जुलै 2018 पासून पुढे |

भरती प्रक्रीया संदर्भातील सर्व कार्यक्रम, कार्यक्रमातील बदल, सुचना वगैरे www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येतील. उमेदवारांशी कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नसून या संकेतस्थळावर संपर्क साधण्याची दक्षता उमेदवारांनी घ्यावयाची आहे.

पदनाम :- पुरवठा निरीक्षक, गट क. वेतन श्रेणी :- रु. 5200-20200 (ग्रेड वेतन 2800)

### 1) विभागीय आयुक्त : कोकण विभाग

| अ.क्र | प्रवर्ग | एकूण पदसंख्या | सामाजिक/समांतर आरक्षण | | | | | | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | महिला | माजी सैनिक | अंशकालीन | प्रकल्पग्रस्त | भूकंपग्रस्त | खेळाडू | |
| | | | 30% | 15% | 10% | 5% | 2% | 5% | |
| 1. | अ.जा | 3 | 1 | - | - | - | - | - | 2 |
| 2. | अ.ज | 2 | 1 | - | - | - | - | - | 1 |
| 3. | वि.जा.अ | 1 | - | - | - | - | - | - | 1 |
| 4. | भ.ज.ब | 1 | - | - | - | - | - | - | 1 |
| 5. | भ.ज.क | -- | - | - | - | - | - | - | - |
| 6. | भ.ज.ड | -- | - | - | - | - | - | - | - |
| 7. | वि.मा.प्र | -- | - | - | - | - | - | - | - |
| 8. | इ.मा.व | 4 | 1 | 1 | - | - | - | - | 2 |
| 9. | खुला | 12 | 4 | 2 | 1 | 1 | - | 1 | 3 |
| 10 | अपंग | विकलांग (चलन वलन विषयक विकलांगता (OA, OL - 1 पद) | | | | | | | |
| | **एकूण** | **23** | **7** | **3** | **1** | **1** | **0** | **1** | **10** |

## 2) विभागीय आयुक्त : नाशिक विभाग

| अ.क्र | प्रवर्ग | एकूण पदसंख्या | सामाजिक/समांतर आरक्षण | | | | | | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | महिला | माजी सैनिक | अंशकालीन | प्रकल्पग्रस्त | भूकंपग्रस्त | खेळाडू | |
| | | | 30% | 15% | 10% | 5% | 2% | 5% | |
| 1. | अ.जा | 4 | 1 | 1 | - | - | - | - | 2 |
| 2. | अ.ज | 2 | 1 | - | - | - | - | - | 1 |
| 3. | वि.जा.अ | 1 | - | - | - | - | - | - | 1 |
| 4. | भ.ज.ब | 1 | - | - | - | - | - | - | 1 |
| 5. | भ.ज.क | 1 | - | - | - | - | - | - | 1 |
| 6. | भ.ज.ड | 1 | - | - | - | - | - | - | 1 |
| 7. | वि.मा.प्र | 1 | - | - | - | - | - | - | 1 |
| 8. | इ.मा.व | 6 | 2 | 1 | 1 | - | - | - | 2 |
| 9. | खुला | 15 | 5 | 2 | 2 | 1 | - | 1 | 4 |
| 10. | अपंग | विकलांग (चलन वलन विषयक विकलांगता (OA, OL - 1 पद) | | | | | | | |
| | **एकूण** | **32** | **9** | **4** | **3** | **1** | **0** | **1** | **14** |

## 3) विभागीय आयुक्त : पुणे विभाग

| अ.क्र | प्रवर्ग | एकूण पदसंख्या | सामाजिक/समांतर आरक्षण | | | | | | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | महिला | माजी सैनिक | अंशकालीन | प्रकल्पग्रस्त | भूकंपग्रस्त | खेळाडू | |
| | | | 30% | 15% | 10% | 5% | 2% | 5% | |
| 1. | अ.जा | 5 | 2 | 1 | 1 | - | - | - | 1 |
| 2. | अ.ज | 2 | 1 | - | - | - | - | - | 1 |
| 3. | वि.जा.अ | 1 | - | - | - | - | - | - | 1 |
| 4. | भ.ज.ब | 1 | - | - | - | - | - | - | 1 |
| 5. | भ.ज.क | 1 | - | - | - | - | - | - | 1 |
| 6. | भ.ज.ड | 1 | - | - | - | - | - | - | 1 |
| 7. | वि.मा.प्र | 1 | - | - | - | - | - | - | 1 |
| 8. | इ.मा.व | 7 | 2 | 1 | 1 | - | - | - | 3 |
| 9. | खुला | 17 | 5 | 3 | 2 | 1 | - | 1 | 5 |
| 10. | अपंग | विकलांग (चलन वलन विषयक विकलांगता (OA, OL - 1 पद) | | | | | | | |
| | **एकूण** | **36** | **10** | **5** | **4** | **1** | **0** | **1** | **15** |

## 4) विभागीय आयुक्त : औरंगाबाद विभाग

| अ.क्र | प्रवर्ग | एकूण पदसंख्या | सामाजिक/समांतर आरक्षण | | | | | | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | महिला | माजी सैनिक | अंशकालीन | प्रकल्पग्रस्त | भूकंपग्रस्त | खेळाडू | |
| | | | 30% | 15% | 10% | 5% | 2% | 5% | |
| 1. | अ.जा | 4 | 1 | 1 | **1** | - | - | - | **1** |
| 2. | अ.ज | 2 | 1 | - | - | - | - | - | **1** |
| 3. | वि.जा.अ | 1 | - | - | - | - | - | - | **1** |
| 4. | भ.ज.ब | 1 | - | - | - | - | - | - | **1** |
| 5. | भ.ज.क | 1 | - | - | - | - | - | - | **1** |
| 6. | भ.ज.ड | 1 | - | - | - | - | - | - | **1** |
| 7. | वि.मा.प्र | 0 | - | - | - | - | - | - | - |
| 8. | इ.मा.व | 5 | 2 | 1 | **1** | - | - | - | **1** |
| 9. | खुला | 14 | 4 | 2 | **1** | **1** | - | **1** | **5** |
| 10. | अपंग | विकलांग (चलन वलन विषयक विकलांगता (OA, OL - 1 पद) | | | | | | | |
| | **एकूण** | **29** | **8** | **4** | **3** | **1** | **0** | **1** | **12** |

**टिप :- वर नमुद केलेल्या सर्व विभागातील पदसंख्येत व आरक्षणात बदल होण्याची शक्यता आहे.**

1) उमेदवारांची निवड ही उमेदवाराने प्राध्यान्यक्रम दिलेल्या विभागानुसार व त्याला प्राप्त झालेले गुणांचे आधारे तयार करणेत आलेल्या गुणवत्ता यादीनुसारच करणेत येणार आहे. गुणवत्ता यादीनुसार व प्राधान्य क्रम यांच्या आधारे निवड झालेल्या उमेदवारांची विभाग निहाय यादी सर्व विभागीय आयुक्तांकडे पाठविण्यात येईल.
2) अपंगाची पदे भरताना सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक दिनांक 19/03/2010 मधील सुचनेनुसार अपंगाची पदे सामाजिक प्रवर्गात दर्शविण्यात आलेली नाहीत. मात्र गुणवत्तेनुसार निवड झालेले उमेदवार ज्या प्रवर्गाचे असतील त्याच सामाजिक प्रवर्गात समांतर आरक्षण म्हणून सामावून घेण्यात येईल. अशा परिस्थितीत जेवढी अपंगाची पदे भरण्यात येतील तेवढी पदे त्या सामाजिक आरक्षणातील समांतर आरक्षणाव्यतिरिक्त इतर पदामधून कमी करण्यात येतील.
3) पुरवठा निरीक्षक संवर्गामध्ये निवड झालेल्या उमेदवारांना त्याचे विभागाचे प्राध्यान्य क्रमानुसार, त्या विभागातील समांतर व सामाजिक आरक्षणनिहाय व गुणवत्तेनुसार पात्र उमेदवारांना पदस्थापना देणेची पध्दती व अधिकार अध्यक्ष, विभागीय निवड समितीने स्वत:कडे राखून ठेवले आहेत. यामध्ये उमेदवारांना कार्यालय निवडण्याचे अधिकार नाहीत.
4) वि.जा.(अ), भ.ज (ब), भ.ज (क),व भ.ज (ड) प्रवर्गातील आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदासाठी संबंधित वर्गवारीतील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अदयावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध प्रवर्गातील उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.
5) उमेदवारांना सर्व विभागासाठी प्राधान्यक्रम द्यावयाचा आहे.

## 1) वेतन श्रेणी :-

पुरवठा निरीक्षक संवर्ग (रक्कम रुपये 5200-20200 (ग्रेड पे-2800/-) तसेच महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते.

## 2) शैक्षणिक अर्हता :-

अ) उमेदवार **मान्यता प्राप्त** (संविधीक विद्यापीठ) विद्यापीठाचा पदवीधर असणे आवश्यक आहे. परंतु " अन्न तंत्रज्ञान किंवा अन्न विज्ञान" विषयामध्ये पदवी धारण करणा-या उमेदवारांना परिक्षेत समान गुण असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

ब) उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

क) **संगणक अर्हता पात्र प्रमाणपत्र** -

- D.O.E.A.C.C सोसायटीच्या अधिकृत ' C.C.C ' किंवा ' O ' स्तर 'A' स्तर किंवा 'B' किंवा 'C' स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र **किंवा**
- महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ मुंबई यांचेकडील अधिकृत MSCIT ची परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र नियुक्तीनंतर विहीत मुदतीत सादर करणे आवश्यक राहील. नसल्यास महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण-2000/ प्र. क्र. 61/2001/39 दिनांक 19 मार्च 2003 संगणक अर्हता नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील. तसेच शासन निर्णय, माहिती तंत्रज्ञान (सामान्य प्रशासन विभाग) क्र. मातंस 2012/प्र. क्र. 277/39 , दिनांक 4 फेब्रुवारी, 2013 मध्ये नमुद केलेल्या संगणक/माहिती तंत्रज्ञान विषयक 86 प्रमाणपत्रांपैकी कोणतेही एक प्रमाणपत्र धारक असावा.

ड) माध्यमिक शालांत परीक्षेत मराठी/हिंदी विषयाचा समावेश नसल्यास, निवड झालेल्या उमेदवारांना एतदर्थ मंडळाची मराठी/हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

## 3) वयोमर्यादा :-

अ) उमेदवारांचे वय दिनांक 01/08/2018 रोजी किमान 18 वर्ष पूर्ण झालेले आवश्यक आहे. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग यांजकडील शासन निर्णय क्र. एसआरव्ही-2015/प्र.क्र.404/कार्या-12 दिनांक 25/04/2016 अन्वये खुल्या प्रवर्गासाठी कमाल 38 वर्षे व मागासवर्गीय उमेदवारांसाठी कमाल 43 वर्षे अशी राहील. तसेच सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई यांजकडील शासन निर्णय क्र. पअंक-1009/ प्र.क्र. 200/2009/16-अ दिनांक 27/10/2009 नुसार अंशकालीन उमेदवारांसाठी कमाल वय 46 राहील.

आ) सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई यांजकडील शासन निर्णय क्रमांक निवक-1010/प्र.क्र.08/2010/ 16-अ दिनांक 06/10/2010 नुसार प्रकल्पग्रस्त/भुकंपग्रस्त/1994 नंतरचे निवडणूक कर्मचारी/1991 चे जनगणना कर्मचारी/स्वातंत्र्यसैनिकांचे पाल्य/अपंग या प्रवर्गातील उमेदवारांसाठी वयोमर्यादा उमेदवाराच्या वयाच्या किमान 18 व कमाल 45 वर्षा पर्यंत शिथिल राहील. त्याबाबत उमेदवार यांनी शासन निर्णय क्र. 1097/ प्र. क्र. 77/9716-अ दिनांक 12/03/1998 मधील निकष पूर्ण केलेले असावे.

इ) माजी सैनिकांसाठी विहित वयोमर्यादेतील सवलत, सामान्य प्रशासन विभाग, शासन शुध्दिपत्रक क्र. मासैक-1010/प्र.क्र.279/1016-अ दिनांक 20/08/2010 मधील तरतुदीप्रमाणे शिथिलता देण्यात येईल.

ई) शासन निर्णयाप्रमाणे पात्र खेळाडूसाठी वयाची अट 5 वर्षापर्यंत शिथिलक्षम असेल. (खुला प्रवर्ग 38+5, मागास प्रवर्ग 43+5)

उ) अपंग उमेदवारासाठी कमाल वयोमर्यादा 45 वर्षापर्यंतच शिथिल राहील.

ऊ) शासकीय/निमशासकीय सेवेतील कर्मचा-यासाठी कमाल वयोमर्यादा 45 वर्षापर्यंत शिथील राहील.

## 4) पात्रतेच्या अटी व शर्ती :-

अ) उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याबाबत सक्षम अधिका-यांचे प्रमाणपत्र आवश्यक राहील.

1) शासन निर्णय क्र. रिपभ/प्र.क्र.66/2011/ई-10 दिनांक 27 जून 2011 नुसार ज्या परिक्षार्थींकडे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) उपलब्ध नसल्यास त्यांनी त्यांचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याचा जन्म दाखला (Birth Certificate) सादर करणे आवश्यक आहे. अशा प्रकरणात अधिवास प्रमाणपत्राची अट लागू राहणार नाही.

2) सदर परीक्षार्थीकडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्मतारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास, त्या परीक्षार्थीने आपला शाळा सोडल्याचा दाखल्यामध्ये त्या परीक्षार्थीचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक आहे. अशा प्रकरणात देखील अधिवास प्रमाणपत्राची आवश्यकता असणार नाही.

3) उपरोक्त बाबी फक्त महाराष्ट्र राज्यात जन्म झालेल्या परीक्षार्थींसाठी लागू राहतील. इतर परीक्षार्थी/ उमेदवारांसाठी अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) आवश्यक राहील.

आ) आरक्षित मागास प्रवर्गाचा दावा करणा-या उमेदवारांना त्या संदर्भातील सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले जाती प्रमाणपत्र (Caste Certificate) आवश्यक राहील. व उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्राची (Caste Validity Certificate) साक्षांकित प्रती निवडीअंती सादर करणे आवश्यक आहे. जात वैधता प्रमाणपत्र नसल्यास सामान्य प्रशासन विभाग यांजकडील शासन निर्णय क्र. बीसीसी-2011/प्र.क्र.1064/2011/16-ब दिनांक 12/12/2011 मधील तरतुदीनुसार याचिका क्र. 2136/2011 व अन्य याचिकांवर मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिनांक 25/08/2011 रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल केलेल्या एसएलपी मधील आदेशाच्या अधीन राहून, तात्पुरती नियुक्ती आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून 6 महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे, अन्यथा त्यांची नियुक्ती पूर्व लक्षी प्रभावाने रद्द करणेत येईल. मागासवर्गीय उमेदवारांसाठी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिका-यांचे वैध प्रमाणपत्र आवश्यक राहील.

इ) परिक्षेच्या कोणत्याही टप्प्यावर, मागासवर्गीयासाठी विहित केलेली वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक अटी/निकषांसंदर्भात कोणतीही सूट/सवलत घेतली असल्यास अशा उमेदवारांची अमागास (सर्वसाधारण) पदावर शिफारस करण्यात येणार नाही. परिक्षा शुल्कामधील सवलत ही या प्रयोजनसाठी समजली जाणार नाही.

ई) अमागास उमेदवारांकरीता विहित केलेल्या वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक निकषांसंदर्भातील अटींची पूर्तता करणा-या सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारांसह) अमागास सर्वसाधारण पदावरील शिफारशींकरीता विचार होत असल्याने, सर्व मागास आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित /उपलब्ध नसले तरी, अर्जामध्ये त्यांच्या मूळ आरक्षण प्रवर्गासंदर्भातील माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.

उ) महिला उमेदवारांनी पूर्वाश्रमीच्या नावाने (लग्नापूर्वीचे) अर्ज करणे आवश्यक आहे.

ऊ) पुरवठा निरीक्षक संवर्गातील पदांसाठी निवड झालेल्या उमेदवारांना पुरवठा निरीक्षक, गोदाम व्यवस्थापक श्रेणी-2, धान्य खरेदी निरीक्षक, प्रथम श्रेणी लिपीक, वरिष्ठ लिपीक, अव्वल कारकून यापैकी कोणत्याही

पदावर गुणवत्ता व प्राधान्यक्रमाच्या आधारे नेमून दिलेल्या विभागांतर्गत येणा-या कोणत्याही जिल्ह्यात नियुक्ती देण्यात येईल. याबाबत उमेदवारांच्या पसंतीचा विचार केला जाणार नाही.

ए) नियुक्ती होणा-या उमेदवारांस शासन निर्णय दिनांक 01/11/2005 नुसार लागू करण्यात आलेली नवीन परिभाषीत अंशदान निवृत्ती योजना (Contributory Fund) लागू राहील.

## 5) परीक्षा शुल्क :-

| पदाचे नाव | खुल्या प्रवर्गातील उमेदवार | मागास (राखीव) प्रवर्गातील उमेदवार | अधिक बँक कमिशन व प्रोसेसिंग चार्जेस इ. |
|---|---|---|---|
| | रु. 300/- | रु. 150/- | |
| पुरवठा निरीक्षक | माजी सैनिक :- परीक्षा शुल्क नाही. | | |

अ) माजी सैनिकासाठी परीक्षा शुल्क आकारले जाणार नाही.

ब) सेवायोजन कार्यालय, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, जिल्हा सैनिक मंडळाकडील उमेदवारांनी तसेच प्रकल्पग्रस्त, अंशकालीन उमेदवारांनी देखील अधिकृत वेबसाईटवर विहीत मुदतीत ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करणे आवश्यक आहे. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्विकारले जाणार नाही अथवा उमेदवारांना कार्यालयामार्फत स्वतंत्रपणे कळविले जाणार नाही.

## 6) महिला उमेदवारांकरीता :-

महिलांसाठी आरक्षित पदांकरीता दावा करणा-या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवासी (Domiciled) असल्याबाबत तसेच नॉन क्रिमीलेअरमध्ये मोडत असल्याबाबत (अ.जा. व अ.ज. वगळून ) स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे. त्यानुसार शासन, महिला व बालविकास विभागाकडील निर्णय क्र. 82/2001/मसेआ-2000/प्र.क्र. 415/का.2/दिनांक 25/05/2001 अन्वये खुल्या प्रवर्गातील महिला, मागासवर्गीय प्रवर्गातील इतर मागासवर्ग, वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज. (क) व भ.ज.(ड), विमाप्र, इमाव या प्रवर्गातील महिला उमेदवारांना उन्नत व प्रगत व्यक्ती व गट यामध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचे दिनांक 31/03/2018 या दिनांकापर्यत वैध असलेले नॉनक्रिमीलेयर प्रमाणपत्राची प्रत सादर करणे आवश्यक आहे. उन्नत व प्रगत व्यक्ती व गटातील महिलांना महिलांसाठी असलेले 30% आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.

## 7) माजी सैनिक उमेदवारांकरीता :-

अ) माजी सैनिक या समांतर आरक्षणातील पदांकरीता आवेदनपत्र सादर करतांना माजी सैनिक म्हणून शासन सेवेकरीता उमेदवार पात्र असावा.

ब) माजी सैनिक या समांतर आरक्षणाचा यापुर्वी लाभ घेवून शासकीय सेवेत नोकरी स्विकारली असेल तर उमेदवार समांतर आरक्षणाचे लाभास पात्र राहणार नाही. केवळ वयाची सवलत घेण्यास पात्र राहील.

क) निवड झालेला उमेदवार माजी सैनिक असल्यास जिल्हा माजी सैनिक बोर्डात नाव नोंदणी केली असल्यास प्रमाणपत्राची तसेच कार्यमुक्त पत्राची प्रत पडताळणीसाठी सादर करणे आवश्यक राहील.

## 8) अंशकालीन पदवीधर उमेदवारांकरीता :-

अंशकालीन पदवीधर/पदविकाधारक उमेदवारांनी जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रात अद्ययावत नोंदणी केलेली असावी.

## 9) प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त उमेदवारांकरीता :-

प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी प्रकल्पग्रस्त असल्याबाबत संबंधित जिल्हा पुनर्वसन अधिका-यांकडील प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

## 10) अपंग उमेदवारांकरीता :-

अ) विकलांग उमेदवारांची पात्रता शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील. अपंग व्यक्तिसाठी आरक्षित पदावर नियुक्तीकरीता संबंधित व्यक्तीने त्या पदासाठी असलेली विहीत अर्हता धारण करणे आवश्यक आहे. तसेच त्या पदावर काम करण्यास सक्षम असला पाहिजे.

आ) विकलांगांसाठी असलेली पदे भरावयाच्या एकुण पदसंख्येपैकी असतील.

इ) विकलांगासाठी आरक्षित पदांवर शिफारस करताना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे, याचा विचार न करता विकलांग गुणवत्ता क्रमांकानुसार त्याची शिफारस करण्यात येईल.

ई) विकलांग व्यक्तीसाठी असलेल्या वयोमर्यादेचा अथवा इतर कोणत्याही प्रकारचा फायदा घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक अप्रवि-2012/प्र.क्र.297/आरोग्य -6, दिनांक 6 ऑक्टोबर 2012 मधील आदेशानुसार SADM या नविन संगणक प्रणालीव्दारे वितरीत करण्यात आलेले नविन नमुन्यातील विकलांगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

उ) अपंग व्यक्ती समान संधी हक्काचे संरक्षण संपूर्ण सहभाग अधिनियम, 1995 मधील तरतुदीनुसार किमान 40% अपंगत्व असलेले अपंग उमेदवार पात्र असतील.

ऊ) अपंग उमेदवाराची पात्रता शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील. अपंगांसाठी आरक्षित असलेल्या पदावर कोणत्याही सामाजिक आरक्षणातील/प्रवर्गातील उमेदवार अर्ज करु शकतात.

ऋ) फक्त दृष्टीहीन, अल्पदृष्टी, अस्थिव्यंग, सेरेब्रल पाल्सी आणि डिस्लेक्सियाने बाधित व किमान 40% कायमस्वरुपी विकलांगत्व असलेल्या पात्र उमेदवारांना, ते लिहीण्यासाठी सक्षम नसल्यास, परीक्षा प्रयोजनार्थ गुणवत्तेनुसार लेखनिकाची मदत घेता येईल व अनुग्रह कालावधी (Compensatory Time) अनुज्ञेय राहील.

ए) अपंग उमेदवारांना परीक्षेच्या वेळी लेखनिकाची मदत आवश्यक असल्यास, उमेदवारांनी अर्ज भरताना तशी मागणी करावी. त्यानुसार उमेदवारास प्रवेशपत्रासोबत लेखनीकासाठीचे घोषणापत्र उपलब्ध करून देण्यात येईल. ते राजपत्रित अधिकारी यांचेकडून प्रती स्वाक्षरीत करून घेणे आवश्यक राहील. त्याची प्रत परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. लेखनिकाची शैक्षणिक पात्रता, पदांस आवश्यक असलेल्या शैक्षणिक पात्रतेपेक्षा एक पायरी/टप्पा कमी असावी. उमेदवाराने स्वत: लेखनिकाची व्यवस्था करावयाची आहे. ऐनवेळी लेखनिकाच्या मदतीची परवानगी देता येणार नाही. उमेदवाराने स्वत: लेखनिकाची व्यवस्था केल्यास त्याच्या

मानधनाची व्यवस्था उमेदवाराकडून करण्यात येईल. लेखनिकांने स्वत:चे फोटो ओळखपत्र सोबत ठेवणे आवश्यक आहे.

**11) खेळाडू उमेदवारांकरीता :-**

**11.1-** शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमाक : राक्रीधो -2002/प्र.क्र.68/क्रीयुसे-2, दिनांक 1 जुलै 2016 तसेच शासन शुध्दीपत्रक क्रमांक :राक्रीधो- 2002/प्र.क्र.68/क्रीयुसे-2, दिनांक 18 ऑगस्ट, 2016 आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणासंदर्भात तसेच वयोमर्यादेतील सवलतीसंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

**11.2** प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणाचा दावा करणा-या उमेदवारांच्या बाबतीत त्यांची क्रीडा विषयक प्रमाणपत्रे योग्य दर्जाची असल्याबाबत व तो उमेदवार खेळाडू प्रवर्गातील आरक्षित पदासाठी पात्र ठरतो याबाबत, ऑनलाईन अर्ज सादर करण्यापूर्वीच, सक्षम अधिका-याने प्रमाणित केलेले प्रमाणपत्र प्राप्त केलेले असणे आवश्यक आहे.

**11.3** संचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय किंवा सक्षम प्राधिका-याकडे प्रमाणपत्रे सादर करताना पात्र खेळाडू उमेदवाराने प्राविण्य प्राप्त खेळाडू प्रवर्गातील आरक्षित पदासाठी पात्र ठरणारी आपापली खेळाडू विषयक सर्व प्रमाणपत्रे एकाच वेळी सादर करणे आवश्यक आहे.

**11.4** क्रीडा प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत व खेळाडू कोणत्या संवर्गासाठी पात्र ठरतो याविषयी अर्ज सादर करण्यापूर्वीच्या दिनांकाचे सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले प्रमाणपत्र सादर केले तर त्याला खेळाडू प्रवर्गाच्या आरक्षणाचा लाभ घेता येईल.

**खेळाडू उमेदवारांनी खालीलपैकी पात्रता धारण करणे आवश्यक आहे.**

अ) वैयक्तिक अथवा सांघिक क्रिडा स्पर्धांमध्ये किमान राज्यस्तरीय अजिंक्यपद स्पर्धेत प्रथम, व्दितीय व तृतीय स्थान प्राप्त केल्याचे किंवा सुवर्ण, रौप्य किंवा कांस्य पदक प्राप्त केल्याचे प्रमाणपत्र.

आ) राज्य अजिंक्यपद स्पर्धा या खेळांच्या स्पर्धा महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनशी संलग्न असलेल्या अधिकृत राज्य संघटनेने आयोजित केलेल्या असाव्या अथवा महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनने स्वत: आयोजित केलेल्या असाव्यात. किमान प्राविण्यापेक्षा उच्च स्तरावरील क्रिडा प्राविण्य मिळविणा-या उमेदवारास प्राधान्य दिले जाईल. वैयक्तिकरीत्या किंवा आमंत्रित स्वरुपाच्या स्पर्धांमध्ये भाग घेतलेल्या खेळाडूंचा यासाठी विचार केला जाणार नाही.

इ) राष्ट्रीय छात्र सेनेमध्ये (एन.सी.सी.) अंडर ऑफिसरचे पद मिळवून राष्ट्रीय छात्र सेनेच्या राष्ट्रीय स्पर्धांमध्ये पदके प्राप्त केलेली व्यक्ती.

ई) भारतीय खेळ प्राधिकरणाने आयोजित केलेल्या राष्ट्रीय शालेय स्पर्धांमध्ये प्रथम, व्दितीय व तृतीय स्थान प्राप्त करणा-या सुवर्ण, रौप्य किंवा कांस्य पदक प्राप्त केलेले खेळाडू.

उ) भारतीय खेळ प्राधिकरणाने आयोजित केलेल्या राष्ट्रीय व राज्य स्तरावरील ग्रामीण व महिला क्रिडा स्पर्धांमध्ये प्रथम, व्दितीय व तृतीय स्थान प्राप्त करणा-या सुवर्ण, रौप्य किंवा कांस्य पदक प्राप्त केलेले खेळाडू.

ऊ) भारतीय शालेय खेळ महासंघ यांनी आयोजित केलेल्या राष्ट्रीय व राज्य स्तरावरील शालेय क्रिडा स्पर्धांमध्ये प्रथम, व्दितीय व तृतीय स्थान प्राप्त करणा-या सुवर्ण, रौप्य किंवा कांस्य पदक प्राप्त केलेले खेळाडू.

**12)** स्वातंत्र्य सैनिकांच्या नामनिर्देशित पाल्यांना आरक्षण नसून नियुक्तीकरीता समान गुण असल्यास प्राधान्य राहील. त्यामुळे अर्ज करतांना स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य आहेत किंवा कसे? याबाबत स्पष्ट उल्लेख करावा.

**13)** समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही 1012/प्र.क्र.16/12/ 16-अ, दिनांक 13 ऑगस्ट 2014 आणि तदूनंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**14)** मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील रिट पिटीशन क्रमांक 2053/2014 प्रकरणी होणा-या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून प्रस्तुत प्रकरणी पदभरतीची कार्यवाही करण्यात येत आहे.

## 15) निवड पध्दती :-

अ) पुरवठा निरीक्षक या पदासाठीची परीक्षा मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, बुध्दिमत्ता चाचणी व अंकगणित या विषयांवर आधारीत असेल.

ब) पुरवठा निरीक्षक या पदाच्या लेखी परीक्षेला सामान्य ज्ञान, बुध्दिमत्ता चाचणी व अंकगणित या विषयाच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा, भारतातील मान्यताप्राप्त विद्यापिठाच्या पदवी परिक्षेच्या दर्जाच्या समान असेल. इंग्रजी व मराठी या विषयाच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमिक शालांत परिक्षेच्या (इयत्ता 12 वी) च्या दर्जाच्या समान राहील. इंग्रजी विषयाची परीक्षा इंग्रजी भाषेतून, मराठी विषयाची परीक्षा मराठी भाषेतून घेण्यात येईल. तर सामान्य ज्ञान, बुध्दिमत्ता चाचणी व अंकगणित या विषयाची परीक्षा इंग्रजी व मराठी भाषेतून घेण्यात येईल. परीक्षेचा कालावधी 2 ( दोन ) तास राहील.

क) या परिक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाच्या असतील. उमेदवारास गुणवत्तापात्र ठरण्यासाठी लेखी परिक्षेत किमान 45% गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

ड) वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन करतांना उत्तरपत्रिकेत नमुद केलेल्या योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील.

इ) परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या गुणवत्ता प्राप्त उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करुन संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. त्यानंतर गुणवत्ताप्राप्त उमेदवारांचे मुळ दस्तऐवजाची पडताळणी करुन पात्र उमेदवाराची अंतिम निवड यादी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

ई) उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी स्वखर्चाने यावे लागेल.

फ) निवड प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर 60 दिवसांचे कालावधीनंतर प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका नष्ट केल्या जातील.

ग) शासन, सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रमांक. एसआरव्ही-1097/प्र.क्र.31/98/16-अ दिनांक 16/03/1999 अन्वये समांतर आरक्षणातील प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध झाले नाही तर समांतर आरक्षणातील त्या त्या प्रवर्गातील उमेदवारांना उपलब्धतेनुसार पर्याप्त संख्येत यादीतील शेवटचे उमेदवार वगळून समाविष्ट करण्यात येईल.

ह) ज्या पात्र उमेदवारांना समान गुण असतील, अशा उमेदवारांचा गुणवत्ता यादीमधील प्राधान्यक्रम सामान्य प्रशासन विभाग यांजकडील शासन निर्णय क्र. प्रानिमं-1215 (प्र.क्र.55/15)/13-अ दिनांक 05/10/2015 मधील निर्णयानुसार करणेत येईल.

आ) विहीत वयोमर्यादेतील शासकीय/निमशासकीय सेवेतील कर्मचा-यांनी त्यांचे कार्यालय प्रमुखांच्या परवानगीने विहीत मार्गाने, विहीत मुदतीत अधिकृत संकेतस्थळावरुन ऑनलाईन अर्ज भरावेत. व पूर्व परवानगीची प्रत उमेदवाराकडे असणे आवश्यक आहे व ती उमेदवाराची निवड झाल्यास छाननीवेळी सादर करणे आवश्यक राहील.

## 16) ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याची प्रक्रिया खालीलप्रमाणे आहे.

उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्यासाठी www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर जावून आपले अर्ज सादर करावेत.

### अर्ज भरण्याची कार्यपध्दती आणि सुचना :-

1) उमेदवाराचे नाव, वडीलांचे, पतीचे नाव, आडनाव, वडीलांचे नाव, आईचे नाव, जन्मदिनांक, भ्रमणध्वनी क्रमांक, छायाचित्र, स्वाक्षरी ही मूलभूत माहिती आहे जी उमेदवाराला सविस्तर द्यावी लागेल.
2) छायाचित्र आणि स्वाक्षरी अपलोड करण्यासंबंधी माहिती - कृपया उंची आणि रुंदी प्रत्येकी 200 pixel असलेले छायाचित्र स्कॅन करुन अपलोड करा आणि अर्जामध्ये अपलोड करा. प्रतिमेची उंची 60 पिक्सल आणि रुंदी 140 पिक्सल असावी. प्रतिमेचे आकारमान 3 KB ते 50 KB च्या दरम्यान असावे. (टिप :- उमेदवाराचे छायाचित्र (फोटोग्राफ) मागील 1 महिना कालावधीच्या आतील असावे.)
3) पत्ता टाकण्यासाठी उमेदवाराने आपल्या पत्याचा प्रकार निश्चित करावा. उदा. कायमस्वरुपी पत्ता, तात्पुरता पत्ता किंवा दोन्ही आणि त्यानुसार आपले गाव, पोस्ट ऑफिस, राज्य, जिल्हा, पिनकोड इ. सहित माहिती भरावी.
4) त्यानंतर उमेदवाराने अतिरिक्त माहितीच्या पर्यायावर क्लिक करावे. आणि आपल्या जात प्रवर्गाबद्दल माहिती भरावी. उमेदवाराकडे जात प्रमाणपत्र असल्यास त्याबद्दल विचारणा केली जाईल. असल्यास ड्रॉपडाऊन मधून त्याने/तिने आपला जात प्रवर्ग निवडावा.
5) ज्यांच्याकडे आधार क्रमांक आहे त्यांनी तत्संबंधी माहिती भरावी. उमेदवाराकडे आधार क्रमांक नसल्यास त्याने/तिने आधार करिता नोंदणी करुन त्यांचा आधार नोंदणी क्रमांक द्यावा.
6) उमेदवारांना अपंग आणि इतर आरक्षणांचा पर्याय पण दिलेला आहे.
7) शैक्षणिक माहितीच्या जागी उमेदवाराने आपली सविस्तर शैक्षणिक माहिती भरावी.
8) एकदा शैक्षणिक तपशिल प्रविष्ट केले की, अर्जदाराला “ पुढे ” या बटनावर क्लिक करावे लागेल, त्या बटणावर क्लिक केल्यानंतर अर्जदाराकडून पुष्टीची विनंती केली जाईल की त्यांनी ते बटण क्लिक केल्यास मागील तपशिल संपादित करण्याची परवानगी दिली जाणार नाही.
9) त्यानंतरचा अर्ज प्रत्येक विभागानुसार आवश्यक त्या माहितीनुसार भरुन घेतला जाईल. उमेदवाराला त्यानुसार माहिती द्यावी लागेल. उमेदवार नोंदणी अर्जामध्ये दिल्याप्रमाणे परीक्षा केंद्राकरिता तीन प्राधान्यक्रम निवडू शकतो. त्यानंतर उमेदवाराने नोंदणी प्रकिया पूर्ण करण्यासाठी ऑनलाईन शुल्क भरावे.
10) उमेदवाराने सगळया नियम व अटी वाचून मान्यता दर्शविण्यासाठी दिलेल्या जागी क्लिक करावे. मान्यता दर्शविल्यानंतरच अर्ज दाखल करण्यासाठीचा “ सबमिट ” हा पर्याय उपलब्ध होईल. उमेदवाराला त्याचा अर्ज डाऊनलोड किंवा प्रिंट करण्याचा पर्याय असेल.
11) ऑनलाईन अर्ज स्विकारण्याच्या अंतिम तारखेस मध्यरात्री 12.00 वाजल्यानंतर संकेतस्थळावरील लिंक बंद केली जाईल.
12) जर कोणत्याही उमेदवाराने एकापेक्षा अधिक लॉगिन आयडीसह नोंदणी केली असेल तर उमेदवारांची पहिली यशस्वी नोंदणी फक्त पुढील प्रकिया जसे हॉल तिकीट, परीक्षेत उपस्थिती, गुणवत्ता यादी आणि अन्य संबंधित प्रकियांसाठी विचारात घेण्यात येईल. कोणत्याही डुप्लीकेट नोंदणीस अवैध नोंदणी मानले जाईल आणि कोणत्याही प्रकारचे पैसे परतफेड केले जाणार नाहीत. उमेदवाराद्वारे प्रथम यशस्वी नोंदणीमध्ये काही चुकीची

माहिती देण्यात आली असेल तर कृपया या विषयाबद्दलची योग्य प्रक्रिया जाणून घेण्यासाठी enquiry@mahapariksha.gov.in वर लिहा किंवा टोल फ्री नंबर 180030007766 वर कॉल करा.

नोंद :- नोंदणीमधील तपशिल जसे की, वापरकर्ता नाव, ई-मेल आयडी, प्रवर्ग आरक्षण (लागू, समांतर किंवा प्रवर्ग आरक्षण) पसंतीचे स्थान, जन्मतारीख, उमेदवाराचे छायाचित्र (फोटोग्राफ) आणि स्वाक्षरी इत्यादी फॉर्म सादर केल्यानंतर बदलण्याची परवानगी दिली जाणार नाही.

## अर्जातील माहितीचे पूर्वावलोकन :-

1. युजरनेम आणि पासवर्ड वापरुन लॉगइन केल्यावर उमेदवार आपला संक्षिप्त अर्ज पाहू शकतो.
2. अर्ज प्रिंट काढण्यासाठी " **प्रिंट प्रिव्ह्यू** " या पर्यायावर क्लिक करा.

## Online परीक्षा शुल्क भरणा करण्याची पध्दती

अ) परीक्षा शुल्क भरणा करण्याकरिता फक्त ऑनलाईन पर्याय उपलब्ध आहेत. त्यासाठी उमेदवार क्रेडीट कार्ड/ डेबीट कार्ड/ एटीएम पिन/इंटरनेट बँकींग/वॅलेट/कॅश कार्ड/आयएमपीएस द्वारे शुल्क भरणा करु शकतात.

ब) उमेदवार आपापल्या सोयीनुसार वरीलपैकी कोणत्याही एका पध्दतीनुसार शुल्क भरणा करु शकतात. उमेदवाराला जर वीज पुरवठा किंवा इंटरनेट सेवा खंडीत झाल्यामुळे शुल्क भरणा करता आला नाही तर त्याने पुन्हा लॉगइन करुन भरणा प्रकिया पूर्ण करावी.

क) शुल्क भरणा झाल्यावर उमेदवाराला " भरणा यशस्वी " म्हणून संदेश मिळेल. भरणा केलेल्या शुल्काची नोंद माहिती अर्जामध्ये आपोआप येईल.

ड) ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर उमेदवाराला त्याच्या प्रोफाईलमध्ये परीक्षा शुल्क भरणा झाला आहे किंवा कसे याची स्थिती (Status)अवगत होईल. त्याची उमेदवाराने अर्ज सादर करण्यापूर्वी तपासणी करुन खात्री करणे अथवा परीक्षा शुल्काचा भरणा झाल्याबाबत स्थिती उपलब्ध नसल्यास पुन्हा शुल्क भरणे आवश्यक आहे. विहीत दिनांकानंतर या संदर्भातील कोणत्याही प्रकारच्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

## इतर महत्वाची माहिती :

1) उमेदवारांनी www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर जाऊन जाहिरात सविस्तर अभ्यासावी, भरावयाची सर्व माहिती आपल्याकडे उपलब्ध आहे याची खात्री करावी व नंतर आपला अर्ज भरावा. अर्ज फक्त Online पध्दतीनेच स्विकारले जातील. कार्यालयात प्रत्यक्ष कोणतेही अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत.
2) एकदा भरलेले शुल्क अर्जदारास कोणत्याही परिस्थितीत परत केले जाणार नाही. सदर परीक्षा शुल्क अहस्तांतरणीय आहे.
3) उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरतांना सर्व माहिती काळजीपुर्वक भरावी. योग्य त्या ठिकाणी आवश्यक माहिती भरावी व अर्ज सादर (Submit) करावा. सादर केलेल्या अर्जाची प्रिंटआऊट काढून घ्यावी. इंटरनेटवर उपलब्ध होणारा नोंदणी क्रमांक जपून ठेवावा. ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर मूळ अर्जाची प्रत या कार्यालयाकडे पाठवू नये. सदर मूळ अर्ज कागदपत्र पडताळणीचे वेळी सादर करावेत.
4) उमेदवारास कोणत्याही इंटरनेट कॅफे किंवा इंटरनेट सुविधा उपलब्ध असलेल्या संगणकावरुन अर्ज भरता येईल.

5) वय, शैक्षणिक अर्हता, मागास प्रवर्ग / नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र , अपंग, महीला, माजी सैनिक, पात्रता इत्यादी संदर्भात न चुकता अर्जामध्ये स्पष्टपणे / निर्विवादपणे दावा करणे आवश्यक आहे. अर्जातील संबंधित रकान्यात स्पष्टपणे दावा केला नसल्यास संबंधित दाव्याचा विचार केला जाणार नाही. उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही.

6) वयाच्या पुराव्यासाठी सक्षम प्राधिका-याने दिलेला जन्माचा दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, एस.एस.सी परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र, वय व अधिवासाबाबत शासनाकडील सक्षम अधिका-यांने दिलेले प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येईल.

7) एस.एस.सी प्रमाणपत्र अथवा शाळा सोडल्याचा दाखला, जन्माचा दाखला, व प्रमाणपत्रावरील जन्म दिनांकानुसार अर्जामध्ये जन्म दिनांक निवडावा.

8) शैक्षणिक अर्हतेसंदर्भात आवश्यक माहिती दिलेल्या क्रमाने नमूद करावी. संबंधित परीक्षेच्या गुणपत्रिकेवरील दिनांक हा शैक्षणिक अर्हता धारण केल्याचा दिनांक समजण्यात येईल व त्याआधारे उमेदवाराची पात्रता ठरविण्यात येईल.

9) अर्जात हेतुपुरस्पर खोटी माहिती देणे किंवा त्यात बदल करणे किंवा दाखल्यांच्या प्रतीतील नोंदीत अनधिकृतपणे खाडाखोड करणे किंवा खाडाखोड केलेले बनावट दाखले सादर करणे, परीक्षा कक्षात गैरवर्तन, परीक्षेचे वेळी नक्कल करणे, वशिला लावण्याचा प्रयत्न करणा-यांना शिक्षा करण्याचा तसेच प्रचलित कायदा व नियमांचे अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करण्याचा अधिकार विभागीय निवड समितीला राहतील. तसेच विहीत केलेल्या अर्हतेच्या अटी पूर्ण न करणारा अथवा गैरवर्तणूक करणारा उमेदवार कोणत्याही टप्प्यांवर निवड होण्यास अपात्र ठरेल.

10) परीक्षेचे प्रवेशपत्र www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. त्यामुळे अर्ज भरल्यानंतर इंटरनेटवर उपलब्ध होणारा नोंदणी क्रमांक जपून ठेवावा.

11) उमेदवाराने प्रवेशपत्र Online पध्दतीने Download करण्याचा दिनांक संकेतस्थळावर प्रसिध्द केला जाईल.

12) उमेदवाराने प्रवेशपत्र Online पध्दतीने Download करुन घ्यावयाचे आहेत. या कार्यालयाकडून निर्गमित केले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

13) उमेदवाराने प्रवेशपत्र ऑनलाईन पध्दतीने प्राप्त करुन घेतल्यानंतर प्रवेशपत्रासोबत परीक्षेला येताना स्वत:चे फोटो असलेले ओळखपत्र घेवून येणे बंधनकारक आहे. (उदा. आधारकार्ड, पॅन, निवडणूक ओळखपत्र, वाहन परवाना इत्यादी) प्रवेशपत्रासोबत ओळखपत्र नसल्यास उमेदवारास परीक्षा केंद्रावर प्रवेश मिळणार नाही.

14) परीक्षा केंद्र जिल्ह्याच्या ठिकाणी तसेच परीक्षेला बसणा-या उमेदवारांची संख्या विचारात घेवून इतर ठिकाणी सुध्दा राहू शकेल.

15) परीक्षेच्या वेळी परिगणकासारख्या (CALCULATOR) साधनाचा उपयोग करण्यास सक्त मनाई आहे. तसेच उमेदवाराने डिजीटल डायरी, पेजर, मायक्रोफोन, मोबाईल फोन इ. सारखी दूरसंचार साधने परीक्षा केंद्राच्या परिसरात तसेच परीक्षा कक्षात आणण्यास व जवळ बाळगण्यास सक्त मनाई आहे. त्यामुळे उमेदवाराने परीक्षेस येताना उपरोक्त साधने बरोबर आणू नयेत. अशा साधनांच्या सुरक्षिततेची व्यवस्था या कार्यालयाकडून केली जाणार नाही. त्याचप्रमाणे कोणतीही अनाधिकृत वस्तु, पुस्तके किंवा वह्या तसेच त्यांच्या बॅग्ज इ. सामान परीक्षा कक्षामध्ये उमेदवाराने स्वत: जवळ ठेवू नये. या कार्यालयाने परीक्षेच्या

कामासाठी नियुक्त केलेल्या कोणत्याही व्यक्तीस आवश्यकता वाटल्यास उमेदवारांची तपासणी करण्याचा अधिकार आहे. तसेच परीक्षा कक्षामध्ये चहापान, धुम्रपान करण्यास सक्त मनाई आहे.

16) सदर परीक्षा ही 100 प्रश्नांकरीता (प्रत्येकी 2 गुण) 200 गुणांची असेल. परीक्षेचे स्वरुप, गुणांची विभागणी व अभ्यासक्रम जाहीरातीचे शेवटी देणेत आलेला आहे.

17) उमेदवाराने भरलेल्या माहितीच्या आधारे त्यास प्रवेशपत्र देऊन परीक्षेस पात्र करण्यात येईल. त्यामुळे ऑनलाईन अर्ज भरताना वस्तुनिष्ठ व अचुक माहिती भरावी. उमेदवाराची निवड अंतिम गुणवत्ता यादीत झाल्यास ऑनलाईन अर्जाप्रमाणे उमेदवाराची सर्व मुळ प्रमाणपत्रे/अभिलेखे यांची सत्यता पडताळणी करण्यात येईल. सत्यता पडताळणीच्या वेळेस उमेदवाराने ऑनलाईन भरलेल्या अर्जात नमुद केलेल्या माहिती व्यतिरिक्त सादर केलेल्या प्रमाणपत्रांचा/कागदपत्रांचा विचार केला जाणार नाही. तसेच पडताळणी करताना उमेदवाराने ऑनलाईन भरलेल्या अर्जात नमुद केलेल्या बाबींचे प्रमाणपत्र/अभिलेख तो सादर करण्यास असमर्थ ठरल्यास त्याला भरती प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. व पुढील गुणानुक्रमे असलेल्या उमेदवारास संधी देण्यात येईल.

18) उमेदवाराने ऑनलाईन भरलेल्या माहितीच्या आधारे त्यास तात्पुरत्या स्वरुपात पात्र ठरविण्यात येत असून लेखी परीक्षेत गुणानुक्रमे पात्र ठरलेल्या उमेदवारांचे वरील नमुद अटींनुसार आवश्यक कागदपत्रे दस्तऐवज पडताळणीच्या वेळेस तपासण्यात येतील. सदरच्या अटीनुसार आवश्यक कागदपत्रे सादर न केल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल. निव्वळ परीक्षेसाठी अर्ज सादर केल्यास व तद्नंतर उमेदवाराजवळ अटीनुसार आवश्यक दस्तऐवज/प्रमाणपत्रे नसल्यास अपात्र ठरविण्यात येईल. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर चुकीची अथवा खोटी आढळल्यास उमेदवाराची संबंधित पदाची उमेदवारी रद्द करण्यात येईल व त्यामुळे होणा-या सर्व परिणामास उमेदवार स्वत: जबाबदार राहील. तसेच निवड प्रक्रियेच्या संदर्भात सर्व अधिकार निवड समितीने राखून ठेवले आहेत.

19) प्रस्तुत प्रक्रियेत ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरावयाचे असल्याने उमेदवाराने माहिती भरताना अचूक/खरी जी कागदपत्रे/प्रमाणपत्रे उपलब्ध आहेत, अशीच माहिती भरावी. चुकीची/खोटी/दिशाभूल करणारी/अन्य इसमाची अथवा नंतर उशिराने कागदपत्रे/प्रमाणपत्रे उपलब्ध होणारी माहिती भरल्यास व भविष्यात निदर्शनास आल्यास अथवा अशा उमेदवाराची निवड झाल्यास त्यांची निवड रद्द करण्यात येईल व शासनाची फसवणूक केल्या प्रकरणी संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात येईल, याची गांभीर्यपुर्वक नोंद घ्यावी.

20) परीक्षा व निकालासंदर्भातील सर्व माहिती www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

21) आदर्श उत्तरपत्रिका (Answer Key) संकेतस्थळ www.mahapariksha.gov.in वर प्रकाशित करण्यात येईल. त्यावर प्राप्त हरकतींमध्ये तथ्य असल्यास सुधारीत आदर्श उत्तरपत्रिका (Answer Key) प्रसिध्द करण्यात येईल. याबाबत Maha IT चा निर्णय अंतिम राहील.

22) काही अनपेक्षित कारणामुळे परीक्षेच्या वेळापत्रकात काही बदल झाल्यास अथवा परीक्षा स्थगित वा रद्द झाल्यास त्याबाबत उमेदवारांना www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर नोटीसीद्वारे कळविण्यात येईल. निवड प्रक्रियेचे काळात उपरोक्त संकेतस्थळावर वेळोवेळी भेट देऊन माहिती बाबत अद्ययावत राहणे ही उमेदवारांची जबाबदारी आहे.

23) उमेदवाराने उमेदवारीच्या बाबतीत कोणत्याही प्रकारची शिफारस अथवा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल.

24) पदभरतीची प्रक्रिया अत्यंत तर्कशुध्द व पारदर्शक पध्दतीने गुणवत्तेच्या आधारे पार पाडली जाते. उमेदवारांनी कोणत्याही प्रलोभनास बळी पडू नये.

25) या जाहिरातीतील नमूद केलेल्या पदांवर उमेदवारांची निवड न्यायालयीन निर्णय, शासनाच्या विविध विभागाचे शासन निर्णय व परिपत्रके यातील निर्देशनाच्या अधिन असेल.

26) अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे लेखी परीक्षेस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे असणार नाही.

27) आस्थापनेवरील पद भरतीच्या अनुषंगाने वेळोवेळी शासनाकडून प्राप्त होणा-या सुचनांप्रमाणे आरक्षणाबाबत व इतर सुचनांप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल व त्या अटी जशास तशा लागू राहतील.

28) सदरच्या जाहिरातीमध्ये दर्शविलेल्या रिक्त पदांच्या संख्येत कमी/जास्त बदल होण्याची शक्यता आहे. काही अपरिहार्य कारणाने परीक्षा स्थगित झाल्यास त्याबाबत अर्जदारास कोणताही दावा सांगता येणार नाही. परीक्षेचा प्रकार, पदांची संख्या, समांतर आरक्षण यात बदल करणे, परीक्षा स्थगित करणे व रद्द करणे, अंशत: बदल करणे, सेवा भरती प्रक्रियेत बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार अध्यक्ष निवड समिती स्वत:कडे राखून ठेवीत आहेत. उक्त कोणत्याही बाबीवर निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

29) गुणानुक्रमे परीक्षेत उत्तीर्ण व निवड झालेल्या उमेदवारांनी कागदपत्राची तपासणी वेळी सादर करावयाचे मूळ दस्ताऐवज.

अ) मूळ अर्ज प्रतिज्ञापत्रासह, चलन, लहान कुटुंबाबतचे प्रतिज्ञापत्राच्या मूळ प्रती.

ब) शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र.

क) वयासंबधी दाखला (जन्माचा दाखला/शाळा सोडण्याचे प्रमाणपत्र)

ड) जातीचे प्रमाणपत्र/जात वैधता प्रमाणपत्र

इ) अधिवास प्रमाणपत्र

ई) नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागास प्रवर्गा करीता आवश्यक) वैध असणे आवश्यक आहे. वैध प्रमाणपत्र नसलेल्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही व अशा उमेदवारांना राखीव संवर्गाचाच लाभ घेता येणार नाही. खुल्या प्रवर्गातील महिला उमेदवारास महिला आरक्षणा करीता शासन निर्णय क्र.82/2001/मसेआ,2000/प्र.क्र.415/का-2, दिनांक 25/5/2001 नुसार उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे विहीत नमुन्यातील सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

फ) अपंग उमेदवाराने किमान 40 टक्के अपंगत्व असल्याबाबतचे जिल्हा शल्य चिकीत्सक / वैद्यकीय मंडळाचे प्रमाणपत्र.

ग) समांतर आरक्षण अंतर्गत अर्ज केलेल्या उमेदवारांना वर नमुद करण्यात आलेल्या दाखल्या व्यतिरिक्त समांतर आरक्षणाविषयचे प्रमाणपत्र.

ह) सामान्य प्रशासन विभाग शा. नि.क्रं.प्र.अ.क्र. 1005/प्र.क्र.36/05/6-अ. दिनांक 26/5/2005 नुसार लहान कुटुंब असल्याचे विहिती नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे. (नमुना उपलब्ध करुन दिला आहे.)

ळ) शासकीय/निमशासकीय कर्मचारी असल्यास सक्षम प्राधिका-यांची मंजूरी घेतल्याचे ना-हरकत प्रमाणपत्र.

30) सदर नियुक्त्या या तात्पुरत्या स्वरुपाच्या राहतील तसेच १ वर्षाचा परिविक्षाधीन कालावधी असेल.

31) शासकीय सेवेत नियुक्ती झालेनंतर संबंधित उमेदवाराने सहा महिन्याच्या आत वैद्यकीय दृष्ट्या सक्षम असल्याचे जिल्हा शासकीय रुग्णालयातील वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

32) शासकीय सेवेत संबंधित उमेदवाराची नियुक्ती त्याची पूर्वचारित्र्य व वर्तणूक (पोलीस चौकशी) यांच्या समाधानकारक तपासणी अहवालावर अवलंबून राहील व तसा तपासणी अहवाल आक्षेपार्ह असल्यास संबंधित उमेदवाराची नियुक्ती रद्द करण्यात येईल. अशा प्रकरणी सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक चा अप-1012/प्र.क्र.63/16-अ दिनांक 26 ऑगस्ट 2014 नुसार गठीत केलेल्या समितीच्या निर्णयानुसार व परिपत्रकातील मार्गदर्शक सुचनांनुसार कार्यवाही करुन योग्य तो निर्णय घेतला जाईल. तसेच यापूर्वीच संबंधित उमेदवारास नियुक्ती दिली असल्यास कोणतीही पूर्वसुचना न देता सेवेतून काढून टाकण्यात येईल.

33) भरती प्रकियेचे वेळी भरती प्रक्रियेच्या संबंधी वेळोवेळी देण्यात येणा-या सुचना www.mahapariksha.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

34) परीक्षेचे स्वरुप, गुणांची विभागणी व अभ्यासक्रम खालीलप्रमाणे आहे.

**समन्वय अधिकारी तथा**
**उपआयुक्त (पुरवठा)**
**कोकण विभाग**

दिनांक :- 26/05/2018

# पुरवठा निरिक्षक संवर्ग सरळसेवा भरती -2018

| अ.क्र. | विषय | अभ्यासक्रम तपशिल |
|---|---|---|
| 1 | **मराठी भाषा** | * सर्वसामान्य शब्दसंग्रह |
| | (25 प्रश्न ) | * वाक्यरचना |
| | | * व्याकरण |
| | | * म्हणी व वाक्प्रचार यांचा अर्थ आणि उपयोग |
| | | * उता-यावरील प्रश्नांची उत्तरे |
| 2 | **English Language** | * Common Vocabulary |
| | **(25 Questions)** | * Sentence structure |
| | | * Grammar |
| | | * Use of Idioms and Phrases and their meaning |
| | | * comprehension of passage |
| 3 | **सामान्य ज्ञान** | * चालू घडामोडी - जागतिक तसेच भारतातील |
| | (25 प्रश्न ) | * नागरीकशास्त्र - भारताच्या घटनेचा प्राथमिक अभ्यास, राज्य व्यवस्थापन (प्रशासन), ग्राम व्यवस्थापन(प्रशासन). |
| | | * इतिहास- आधुनिक भारताचा विशेषत: महाराष्ट्राचा इतिहास |
| | | * भूगोल - (महाराष्ट्राच्या भूगोलाच्या विशेष अभ्यासासह) - पृथ्वी,जगातील विभाग, हवामान, अक्षांश-रेखांश, महाराष्ट्रातील जमिनीचे प्रकार, पर्जन्यमान, प्रमुख पिके, शहरे, नदया, उदयोगधंदे, इत्यादी. |
| | | * अर्थव्यवस्था - भारतीय अर्थव्यवस्था - राष्ट्रीय उत्पन्न, शेती,उदयोग,परकीय व्यापार, बँकिंग, लोकसंख्या,दारिद्रय व बेरोजगारी, मुद्रा आणि राजकोषीय नीती, इत्यादी. तसेचह शासकीय अर्थसंकल्प, लेखा, लेखापरीक्षण, इत्यादी |
| | | * सामान्य विज्ञान - भौतिकशास्त्र (Physics), रसायनशास्त्र (Chemistry), प्राणिशास्त्र (Zoology), वनस्पतीशास्त्र (Botany), आरोग्यशास्त्र (Hygiene) |
| 4 | **बुध्दिमत्ता चाचणी व अंकगणित** (25 प्रश्न ) | * बुध्दिमापन चाचणी - उमेदवार किती लवकर व अचूकपणे विचार करू शकतो हे आजमावण्यासाठी प्रश्न.<br>* अंकगणित - बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार, दशांश अपूर्णांक व टक्केवारी |

# पुरवठा निरिक्षक संवर्ग सरळसेवा भरती -2018

प्रश्नपत्रिकांची संख्या - 1

प्रश्नाची संख्या- 100

एकुण गुण- 200

| पेपर क्र.01 | विषय | गुण | प्रश्नसंख्या | दर्जा | माध्यम | कालावधी | प्रश्नपत्रिकेचे स्वरूप |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मराठी | 50 | 25 | बारावी | मराठी | 2 तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| | इंग्रजी | 50 | 25 | बारावी | इंग्रजी | | |
| | सामान्य ज्ञान | 50 | 25 | पदवी | मराठी व इंग्रजी | | |
| | बुध्दिमत्ता चाचणी व अंकगणित | 50 | 25 | पदवी | | | |